आजचा शुभ विचार
"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

चला तर आपल्या सेवेत आम्ही आहोत
जेव्हा गरज असेल प्रसिद्धीची किंवा आपल्या व्यवसायाला चालना देण्याची
दैनिक स्वराज्यदूत
आपल्या पाठीशी आहे
आम्ही देत आहोत आपल्याला जलद गतीने प्रसिद्धीसाठी
छापील वृत्तपत्र आणि इ पेपर मध्ये जाहिरातीचा पर्याय
* फक्त २९९९ रुपयात ३० दिवस आपली कोणतीही जाहिरात प्रसिद्ध केली जाईल.
संपर्क -मो. ८४४६६ ७३६७७
स्वराज्यदूत NEWS MEDIA CHANNEL
वेबसाईट ला भेट द्या www.swarajyadoot.com

मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-61 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuseday 08 July 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६१ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. ०८ जुलै २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

# 20 वर्षांनी ठाकरे बंधूंचा घरोबा!

## आता राणेंसह उदय सामंत यांच्या साम्राज्याला हादरे बसणार?

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------





गेल्या 20 वर्षापासून राजकीय चुली वेगळ्या असणाऱ्या ठाकरे बंधुंमध्ये दोन दिवसापूर्वी घरोबा झाला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे मराठीच्या मुद्यावर एकत्र आले. यानंतर आता राज्यातील राजकीय समिकरणं बदलतील? स्थानिकला उद्धव-राज यांचा ठाकरे ब्रँड चालेल अशा चर्चा आता सुरू झाल्या आहेत. पण असे झाल्यास तळकोकणात नारायण राणेंसह उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या साम्राज्याला हादरे बसणार का? तशी ताकद आता ठाकरे बंधू निर्माण करणार का हे पहावं लागणार आहे. मराठी अस्मितेच्या मुद्यावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आता एकत्र आले आहेत. ते आता आगामी स्थानिकसह विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीलाही राहणार असे आता सांगितले जात आहे. तर याचा फटका महाविकास आघाडीसह महायुतीला बसण्याची शक्यता वर्तवली जातेय.

पण ठाकरे बंधू एकत्र जरी आले तरी सिंधुदुर्ग जिल्ह्यात तशी काही ताकद वाढणार नाही. पूर्वी बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे येथे वाढलेली शिवसेना आता संपत आलेली आहे. तर स्वत: राज ठाकरे यांनी काढलेल्या पक्षाचा येथे संपर्क म्हणावा इतका नाही. पक्षाच्या उभारीच्या काळात येथे मनसेचे एखादा दुसरा नगरसेवक होता. पण आज परिस्थिती वेगळी आहे. पक्ष स्थापनेनंतर सिंधुदुर्गात मनसेला चांगले पाठबळ मिळाले होते. मात्र, संघटना बांधणी न झाल्याने या पक्षाचा जनाधार जवळपास संपला.

पूर्वी म्हणजे 1990 च्या सुमारात हा तळकोकण म्हणजे ठाकरेंचा शिवसेनेचा बालेकिल्ला होता. पण नारायण राणे फुटले आणि येथीळ शिवसेनेला गळती लागली. शिवसेनेची ताकद कमी झाली. त्यानंतर कुडाळ आणि सावंतवाडी मतदारसंघांत शिवसेनेनं उभारी घेतली होती. पण पक्ष बांधणी, पदाधिकाऱ्यांना वेळ न देण यामुळे उद्धव ठाकरेंची शिवसेना येथे पार ढेपाळली आहे. काही ठरविक कार्यकर्ते, पदाधिकारी वगळता उर्वरित कार्यकर्ते मोठ्या संख्येने भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करत आहेत.

नुकत्याच झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या निकालातून ठाकरेंच्या शिवसेनेनं जनाधार गमवल्याचे समोर आले आहे. तर मनसेला देखील लोकांनी नाकारल्याचे चित्र आहे. पण जिल्ह्यात बाळासाहेब यांच्यामुळे ठाकरेंना मानणारा मतदार आहे. तो विखूरलेला आहे. पण उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आल्याने तो आता ॲक्टीव्ह होवू शकतो. आताही येथे उद्धव ठाकरेंना मानणारा 50 हजार मतदार असल्याचे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत समोर आलं आहे. जो सिंधुदुर्गातील तिन्ही मतदारसंघात आहे.

सद्यस्थितीत हिंदी भाषेच्या सक्तीचा विषय, दिल्ली लॉबीचे राज्यातील नेत्यांवर वाढते प्रभुत्व यामुळे भाजप आणि शिंदे शिवसेनेबाबत मतदारांची नाराजी आहे. अशीच नाराजी जिल्ह्यात देखील आहे. अशावेळी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याने युतीलाही भवितव्य चांगले आहे. याचा फायदा भविष्यात माजी आमदार वैभव नाईक, परशुराम उपरकर यांच्यासह शिवसेना आणि मनसेच्या नेत्यांना होऊ शकतो.

वीस वर्षानंतर आता उद्धव आणि राज ठाकरे हे दोघे बंधू एकत्र आले आहेत. त्यांच्या एकत्र येण्याने मात्र जिल्ह्यातील राजकारणावर फारसा परिणाम होईल, असे दिसत नाही. कारण सध्या येथील राजकीय स्थिती पाहता मनसेची ताकद सीमित आहे. फक्त काही परिणाम झालाच तर तो खेड, दापोली तालुक्यात होऊ शकतो. तसेच जिल्ह्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे वर्चस्व असले तरी पक्षफुटीमुळे आता ती कमी झाली आहे. सध्या जिल्ह्यात एकनाथ शिंदे यांची शिवसेना अत्यंत मजबूत स्थितीत आहे. येथे शिवसेनेचे दोन मंत्री आणि आमदार असल्यामुळे त्यांची ताकद जास्त आहे.

खेड, दापोली तालुक्यात कोकण संघटक वैभव खेडेकर यांच्यामुळे मनसेची चांगली ताकद आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेवर मनसेचा झेंडा होता. तेथे ठाकरे शिवसेना आणि मनसे एकत्र आले तर काही प्रमाणात फरक पडू शकतो. रत्नागिरी, राजापूरमध्ये काही प्रमाणात मनसे आहे. यावेळी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोघे बंधू एकत्र आल्यामुळे मराठी माणूस ताकदीने सक्रिय होत आहे. युती झाल्यास याचे परिणाम आगामी महापालिका, पालिका निवडणुकीत दिसतील असा दावा रत्नागिरी ठाकरे शिवसेना शहरप्रमुख प्रशांत साळुंखे यांनी केला आहे.

तर असाच दावा मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष अरविंद मालाडकर यांनी देखील केला असून दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याने मराठी माणसाला अनेक वर्षांपासून जे अपेक्षित होते ते झाले आहे. दोघे बंधू एकत्र आल्यामुळे आता एक आणि एक 2 नव्हे तर 11 होतील, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. आता मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांच्या नेत्यांनी केलेल्या दाव्या प्रमाणे खरेच एक आणि एक 2 नव्हे तर 11 होणार की शून्य अधिक शून्य बरोबरच शून्यच राहणार हे येत्या काळात स्पष्ट होणार आहे.

महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे
राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार
कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये

कौतुक तुमच्या कार्याचे

उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
SWARAJYADOOT LIVE
दैनिक वृत्तपत्र वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना
- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

# हो, २६/११ हल्ला झाला तेव्हा मी पाकिस्तानचा विश्वासू एजंट होतो
## मुंबई हल्ल्याचा सूत्रधार मुख्य मास्टरमाइंड तहव्वुर राणाची कबुली

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



२६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वुर राणा याने चौकशीदरम्यान अनेक धक्कादायक खुलासे केले आहेत. राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) ताब्यात असलेल्या राणा याची मुंबई गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू आहे. यामध्ये त्याने अनेक महत्त्वाची माहिती दिली आहे. राणा हा पाकिस्तानी वंशाचा आणि कॅनडाचा रहिवासी आहे. अमेरिकेने एप्रिल २०२५ मध्ये त्याला भारताच्या ताब्यात दिले.

तहव्वुर राणा याने चौकशीदरम्यान माहिती दिली आहे की तो पाकिस्तानी सैन्याचा विश्वासू एजंट होता. तो आखाती युद्धादरम्यान सौदी अरेबियात तैनात होता. राणाने गुन्हे शाखेला सांगितले की माझा साथीदार डेव्हिड कोलमन हेडलीने लष्कर-ए-तोयबासोबत अनेक दहशतवादी प्रशिक्षण शिबिरांमध्ये भाग घेतला होता. तो प्रामुख्याने हेरांच्या नेटवर्कमध्ये काम करत होता. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने राणाचा जबाब नोंदवला आहे. राणाने हेडलीला त्याच्या इमिग्रेशन व्यवसायाद्वारे मुंबईत बनावट कार्यालय उघडण्यास मदत केली होती. हल्ल्याचा कट रचण्यासाठी त्या कार्यालयाचा वापर करण्यात आला होता.

एनआयएच्या सूत्रांनुसार, राणाने लष्कर-ए-तोयबा आणि पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय यांच्यात खोल संबंध असल्याचे उघड केले आहे. त्याने कबूल केले आहे की २००५ पासून पाकिस्तानी खबऱ्यांच्या मदतीने मुंबई हल्ल्याचा कट रचला जात होता. २६/११ हल्ल्याच्या वेळी तो मुंबईत होता अशी कबुली त्याने दिली आहे. एनआयएने राणाची सखोल चौकशी केली आहे. राणा आणि हेडली यांच्यातील ईमेल पत्रव्यवहार, प्रवास तपशील आणि इतर पुरावे यांचे विश्लेषण केले जात आहे. राणावर गुन्हेगारी कट, खून आणि दहशतवादी कृत्यांचे गंभीर आरोप आहेत. एनआयएच्या विशेष न्यायालयाने म्हटले आहे की, राणाच्या चौकशीतून हल्ल्यामागील व्यापक कट उघड होऊ शकतो. राणाच्या प्रत्यार्पणामुळे २६/११ च्या हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग स्पष्ट होईल. माजी सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी विश्वास व्यक्त केला आहे की, मुंबई हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग उघड करण्यासाठी त्यांची कबुली महत्त्वाची ठरेल. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात १६६ जणांना आपले प्राण गमवावे लागले.

# कुणाल कामरा विरुद्ध विशेषाधिकार भंग प्रस्ताव मंजूर, नोटिस पाठवायची की नाही याबद्दल समिती घेणार निर्णय

## समितीच्या तपासानंतर कुणाल कामरा यांना नोटीस पाठवायची की नाही हे ठरवले जाईल

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष राम शिंदे यांनी स्टँड-अप कॉमेडियन कुणाल कामरा यांच्याविरुद्ध "विशेषाधिकार भंग" प्रस्ताव मंजूर केला आहे आणि तो परिषदेच्या विशेषाधिकार समितीने चौकशीसाठी पाठवला आहे. भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी या वर्षी मार्चमध्ये विधान परिषदेत हा प्रस्ताव दाखल केला होता, ज्यामध्ये कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केल्याचा आरोप केला होता. नंतर, महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष राम शिंदे यांनी हा प्रस्ताव मंजूर केला आणि तो विशेषाधिकार समितीकडे पाठवला. आता समिती कामरा यांना नोटीस पाठवायची की नाही यावर सुनावणी करेल आणि निर्णय घेईल.

यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाजपचे विधान परिषदेतील गटनेते आ. प्रवीण दरेकर यांनी विधान परिषदेत कुणाल कामरा यांच्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केला होता. कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी केल्याचा आरोप या प्रस्तावात करण्यात आला होता. सभापती राम शिंदे यांनी या प्रस्तावाला सोमवारी मंजुरी दिली आणि तो हक्कभंग समितीकडे पाठवण्याचा निर्णय घेतला. आता विधान परिषदेची हक्कभंग समिती या प्रकरणाची सखोल चौकशी करेल. समितीच्या तपासानंतर कुणाल कामरा यांना नोटीस पाठवायची की नाही, याबाबत निर्णय घेतला जाईल

कॉमेडियन कुणाल कामराने आपल्या नया भारत या कॉमेडी शोमधून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक एक गाणं तयार करत, त्याचा व्हिडिओ शूट केला होता. त्याचा हा व्हिडिओ तुफान व्हायरल झाल्यानंतर शिवसैनिक चांगलेच संतप्त झाले. तर, दुसरीकडे उबाठा गटाकडूनदेखील हा व्हिडिओ शेअर करण्यात आला होता. सुषमा अंधारेंनी देखील व्हिडिओ बनवला होता. त्यामुळे, या दोघांविरुद्ध हक्कभंग दाखल करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता, त्यास मंजुरी देण्यात आली आहे.

संपादकीय

# असंतुष्ट आत्म्यांचे स्वार्थमिलन

शनिवारी वरळी येथील सभागृहात उबाठाचे नेते उद्धव ठाकरे आणि त्यांचे चुलत भाऊ राज ठाकरे यांचे मनोमिलन झाले. म्हणजे तसे भासवले तरी. पण वास्तवात हे खरोखरच मनोमिलन होते की दोन असंतुष्ट आत्म्यांनी सत्तेसाठी एकत्र येण्यासाठी केलेली तडजोड होती हा प्रश्नच आहे.

फडणवीस यांनी मराठी सक्तीचे करणारा अध्यादेश रद्द केला आणि या दोघांना संधीच मिळाली. त्यात त्यांनी सीनिअर ठाकरे यांनी नेहमीची मळमळ बाहेर काढली आणि आपल्याला सत्तेवरून कसे जावे लागले असा पाढा वाचला, पण त्यात त्यांनी काँग्रेसबरोबर जाऊन सत्ता पटकावली आणि मुख्यमंत्रीपद बळकावले हे याचा त्यांना विसर पडला. शिवसैनिकातील मुख्यमंत्री देऊ, असे म्हणत स्वतःच टुणकन उडी मारून मुख्यनमंत्री पदावर ते जाऊन बसले. हिंदी सक्तीचा करणारा अध्यादेश ठाकरे सरकारनेच काढला होता आणि आता त्याच अध्यादेशाविरुद्ध ते बोंबा मारत आहेत. सत्तेपासून दूर हाकलून काढल्यामुळे त्यांची भाषणे ही केवळ शिव्याशाप आणि तळतळाटाने भरलेली होती. त्यामानाने राज ठाकरे यांचे भाषण बरेच संयमी झाले, पण उद्धव ठाकरे यांच्या भाषणात रडगाणे आणि नेहमीचे रटाळ भाषणाखेरीज काहीही नव्हते. सत्तेसाठी आणि त्यातही मुंबई महापालिकेच्या सत्तेच्या लोण्याच्या गोळ्यासाठी हे दोघे ठाकरे बंधू एकत्र आले आहेत याशिवाय दुसरे काहीही नव्हते.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तर जनतेने पार पिटाळून लावले आहे, पण ठाकरेंना त्यातल्या त्यात सीनिअर ठाकरे यांना मुंबई महापालिका ही अत्यंत महत्त्वाची आहे. कारण तेथूनच ३१ हजार कोटी रुपयांचा निधी येतो. त्यामुळे ही सोन्याची कोंबडी कशी जाऊ द्यायची म्हणून ठाकरे अस्वस्थ झाले. मराठी हे निमित्त आहे कारण मुळचा अध्यादेश जो पहिली ते बारावीपर्यंत हिंदी भाषा सक्ती करणारा ठाकरे यांनीच २०२१ मध्ये लागू केला होता, पण मराठी लोकांची द्रोह केल्याप्रकरणी ठाकरे माफी मागतील अशी अपेक्षा होती. पण त्याऐवजी त्यांनी थेट फडणवीस आणि भाजपावर टीकास्त्र सोडले. दोघेही ठाकरे बंधू हे संपलेले आहेत.

त्यामुळे त्यांच्याकडून यापेक्षा दुसरी काही अपेक्षा करता येणार नाही. आता मुंबई महापालिका तरी वाचवता येते का ते पाहण्यासाठी दोघांचाही अखेरचा प्रयत्न आहे. पण त्यात दोघेही यशस्वी होणार नाहीत ही काळ्या दगडावरची रेघ आहे. वास्तविक मराठीच्या नावाने गळे काढत आहेत त्या मराठीला अभिजात दर्जा मोदी यांनी दिला आणि त्यासाठी भाजपाच्या स्थानिक सरकारने प्रयत्न केले, पण त्यासाठी कुठलीही कृतज्ञता व्यक्त न करता मोदी यांच्यावर आरोप करून ठाकरे यांनी आपण किती खाल्ल्या घरचे वासे मोजणारे आहोत हेच दाखवून दिले आहे.

मुंबईतील मराठी टक्का कमी झाला आहे आणि मराठी माणूस आज बदलापूर ते पार वांगणीपर्यंत फेकला गेला आहे. त्यासाठी कोण जबाबदार आहे आणि गुजरातीवर ठाकरे हे नेहमीच टीका करतात ते ठाकरे अंबानीच्या विवाहात कसे उपस्थित राहतात, हे किरकोळ वाटत असले तरीही प्रश्न आहेतच. मुंबई महापालिकेचे जाऊ द्या, पण ज्या विधानसभेत एकेकाळी शिवसेनेची सत्ता होती त्यांची अवस्था आज काय आहे ते पाहिले, तर ठाकरे यांना लक्षात येईल की, त्यांच्या हातून कधीच सत्ता गेली आहे आणि कोअर व्होटर निघून गेला आहे. उरलेला कोअर व्होटर शिंदे आणि भाजपाकडे आहे.

ठाकरे यांनी बाळासाहेब यांच्या वारसाशी बेईमानी केली आणि आज त्यांना त्यांच्या दारी जावे लागत आहे. पण हे त्यांच्याच कर्माचे फळ आहे. कालच्या समारंभाला फक्त ठाकरे बंधूच होते. शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे वगैरे उपस्थित होत्या पण त्यांचा रोल अगदीच लिंबू-टिंबू होता. त्यामुळे ठाकरे बंधूंकडे सत्ता आलीच, तर इतरांना ते कसे वागवणार याची झलक पाहायला मिळाली. वास्तविक ही रॅली होती, मराठी माणसाच्या भल्यासाठी... पण मराठी माणसाचा एक शब्द उच्चारण्यात आला नाही.

मराठी माणसाचे जास्त नुकसान ठाकरे यांनीच केले आहे. शिवसेनेच्या सत्ता काळात मराठी माणूस मुंबईच्या हद्दीबाहेर गेला आहे. मुंबईत मराठी टक्का का कमी झाला, याचे उत्तर ठाकरे यांनी अगोदर द्यायला हवे. नंतर मग बाकीची बकवास करावी. जरी कालचा ठाकरे बंधू पुनर्मिलनचा होता तरीही त्यात राजकीय वासच जास्त होता आणि केवळ स्वतःचे भवितव्य निश्चित करण्यासाठी दोघे एकत्र आले आहेत हे लक्षात येत होते. चाय बिस्कूट पत्रकारांना ठाकरे यांच्या पुनर्मिलनाचा आनंद झाला असेल पण त्यांच्यासाठी काही पक्ष चालत नसतात. त्यामुळे चाय बिस्कूट पत्रकारांनी आनंद मानला तरी चालेल, पण त्यामुळे महाराष्ट्राला दोघाही ठाकरे बंधूंचे ग्रहण पुन्हा लागू नये. कारण तसे झाले तर, महाराष्ट्र अनेक वर्षे मागे जाईल.

ठाकरे बंधूंचे पुनर्मिलन झाले तरीही त्यात मराठी जनतेला आणि मराठी माणसाला काय मिळाले हे काहीही सांगता येणार नाही. त्याबाबतीत तर सारा आनंदीआनंद आहे. २० वर्षांनंतर दोघे ठाकरे बंधू एकत्र आले होते आणि त्यामुळे काही पत्रकारांना अत्यंत आनंद झाला आहे. ठाकरे बंधू स्वतःच्या स्वार्थासाठी एकत्र आले आहेत आणि हे कुणापासूनच लपून राहिलेले नाही. त्यामुळे सारा फार्स होता आणि त्याचे काही फार काही महत्त्व नाही इतकेच. मुख्यमंत्री फडणवीस यांनी जो टोला लगावला तो अत्यंत समर्पक आहे. ते म्हणाले की हा मराठीचा विजयोत्सव नव्हे, तर रुदालीचा कार्यक्रम होता. इतके समर्पक वर्णन या ठाकरे बंधूंच्या पुनर्मिलनाचे दुसरे काहीही करता येणार नाही.

# 'बीकमिंग अ स्मार्ट स्टुडन्ट' पुस्तक विद्यार्थ्यांसाठी परिवर्तन घडवणारी संजीवनी : रावसाहेब शिंदे

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------

"शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता, विविध उपयुक्त कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. 'बीकमिंग अ स्मार्ट स्टुडन्ट' हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी केवळ मार्गदर्शक नव्हे तर जीवनात परिवर्तन घडवणारे संजीवनी आहे" असे मत कळवण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मा. रावसाहेब शिंदे यांनी व्यक्त केले, कळवण येथील आर. के. एम. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नुकताच 'बीकमिंग अ स्मार्ट स्टुडन्ट' या आराध्या निकमच्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आणि इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम पार पडला, हे पुस्तक लिहिणारी कु. आराध्या निकम ही जगातील सर्वात लहान लेखिका असून, तिने केवळ ८ वर्षांच्या वयात हे प्रेरणादायी पुस्तक लिहिले आहे. विद्यार्थ्यांनी हे पुस्तक वाचून स्मार्ट बनण्याची दिशा आत्मसात करावी, असेही रावसाहेब शिंदे म्हणाले.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती पूजन करण्यात आले, प्रास्ताविक करताना भूषण निकम यांनी पुस्तकाची पार्श्वभूमी, उद्दिष्ट व गरज विषद केली, यानंतर विद्यालयातील इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आराध्या निकम लिखित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी आराध्याने हे पुस्तक नर्सरी ते फर्स्ट ग्रॅज्युएशन पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे आणि हे मला एक लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे असे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांमध्ये ज्येष्ठ शिक्षक के. के. शिंदे, राजेंद्र पवार, विलास शिरोडे, कळवण एज्युकेशन सोसायटीचे सरचिटणीस भूषण पगार, मुख्याध्यापक जी. डी. रौंदळ, परशराम निकम, कृषीभूषण फेडरेशनचे चेअरमन व आराध्याचे वडील भूषण निकम, हरिभाऊ वाघ, बापुराव पगार, शेखर निकम, निलेश दुसाने, खंडेराव निकम, रोहिणी निकम यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती, सूत्रसंचालन गीते सर यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक जी. डी. रौंदळ यांनी व्यक्त केले.

# महागड्या वाहनांवर लागणार आता अधिक कर; एकदाच घेतल्या जाणाऱ्या कर संरचनेत बदल

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------

महाराष्ट्र सरकारने एकदाच आकारल्या जाणाऱ्या वाहन कर संरचनेत बदल केल्यामुळे मंगळवारपासून राज्यात महागड्या कार, सीएनजी/एलएनजी वाहने आणि मालवाहू वाहनांच्या किमती वाढणार आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे, आता एकदाच आकारल्या जाणाऱ्या कराची मर्यादा ₹३० लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे, यापूर्वी ती ₹२० लाख इतकी होती, म्हणजेच, ज्यांच्या एक्स-शोरूम किमती ₹२० लाखांपेक्षा जास्त आहेत अशा गाड्या किमान ₹१० लाखांनी महाग होणार आहेत, असे त्यांनी सांगितले,

आरटीओ अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले की, एखाद्या व्यक्तीच्या नावावर नोंदणी केलेल्या महागड्या डिझेल व पेट्रोल गाड्या, ज्या अनुक्रमे ₹१.३३ कोटी व ₹१.५४ कोटी किमतीच्या आहेत, त्यांच्यावर आता ₹२० लाखांपेक्षा जास्त एकदाच आकारला जाणारा कर भरावा लागणार आहे, जर एखादी गाडी आयात केलेली असेल किंवा कंपनीच्या नावावर नोंदवलेली असेल, तर पेट्रोल व डिझेल दोन्ही प्रकारच्या गाड्यांवर सरसकट २०% एकदाच कर आकारला जातो, असे अधिकाऱ्यांनी सांगितले, आरटीओ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, संकुचित नैसर्गिक वायू (CNG) किंवा द्रवित नैसर्गिक वायूवर (L N G ) चालणाऱ्या गाड्यांवरही सर्व मूल्य वर्गांमध्ये एकदाच्या करात १% वाढ करण्यात आली आहे, त्यामुळे त्या थोड्याशा महाग होतील, एका वरिष्ठ आरटीओ अधिकाऱ्याने सांगितले की, मालवाहू वाहनांवर त्याच्या वजनाऐवजी त्यांच्या किमतीच्या आधारावर कर आकारला जाईल. पूर्वी ₹१० लाख किमतीच्या पिकअप वाहनावर सुमारे ₹२०,००० कर लागत असे, पण आता तो ₹७०, ००० पर्यंत जाईल, परिवहन विभागाच्या संकेतस्थळानुसार, यापूर्वी ७५० किलो ते ७, ५०० किलो एकूण वजन असलेल्या मालवाहू वाहनांवर ₹८,४०० ते ₹३७,८०० पर्यंत कर लागायचा, इलेक्ट्रिक वाहनांना (EVs) मात्र करमाफी मिळतच राहील.

पेट्रोल कारसाठी कर
पेट्रोल कारसाठी (व्यक्तीच्या नावावर नोंदणी)
₹१० लाखांखालील वाहनांसाठी ११%
₹१० लाख ते ₹२० लाख दरम्यानच्या गाड्यांसाठी १२%
₹२० लाखांपेक्षा जास्त किमतीच्या गाड्यांसाठी १३%
डिझेल कारसाठी कर
₹१० लाखांखालील वाहनांसाठी १३%
₹१० लाख ते ₹२० लाख दरम्यानसाठी १४%
₹२० लाखांपेक्षा जास्त किमतीसाठी १५%
वजनाऐवजी किमतीच्या आधारावर कर
मालवाहू वाहनांसाठी - पिकअप ट्रक, टेम्पो (७,५०० किलोपर्यंत एकूण वजन असलेले) तसेच क्रेन, कम्प्रेसर, प्रोजेक्टरसारखी बांधकाम क्षेत्रातील वाहने यांच्यावर आता त्यांच्या किमतीच्या ७% दराने कर आकारला जाईल.

# शेवंती कृष्णा ट्रस्टच्या मोराणे प्र.ल. येथे विठ्ठल रुक्मिणी पालखी सोहळा संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------

धुळे मोराणे (प्र.ल.) उपनगर येथे शेवंती प्रायमरी स्कूल व कृष्णा हायस्कूलच्या वतीने शनिवार, दिनांक 5 जुलै 2025 रोजी 'विठ्ठल रुक्मिणी पालखी सोहळा' संपन्न झाला. या सोहळयास शेवंती कृष्णा ट्रस्टचे अध्यक्ष-डॉ. एन. के.



ठाकरे, खजिनदार पुष्पल ठाकरे व पाहुणे म्हणून डॉ.आशुतोष रमेश पाटील हे उपस्थित होते. वारकऱ्यांची वारी, विठू नामाचा गजर, टाळ-चिपळयांचा नाद यामुळे शाळेतील वातावरण भक्तिमय झाले होते. दिंडीमध्ये टाळकरी, वारकरी लेझीम खेळणारे विद्यार्थी, तुळस घेऊन असलेल्या विद्यार्थिनी यांनी सहभाग घेतला .काही विद्यार्थ्यांनी रिंगण, फुगडी यासारखे नृत्याचे अविष्कार सादर केले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सहकारीही उपस्थित होते. त्यांनीही या सर्व कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला. विद्यार्थ्यांना,शिक्षकांना शिक्षकेतर सहकाऱ्यांना प्रसाद वाटप करण्यात आला व या कार्यक्रमाची सांगता झाली.

# निम-मांजरोद पुलाबाबत राज्यकर्त्यांमध्ये इच्छाशक्तीचा अभाव तापी काठावरील शिष्टमंडळाचे अधिक्षक अभियंत्यांकडे गाऱ्हाणे

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------

धुळेनियोजन मंडळाची प्रशासकीय मान्यता व अर्थसंकल्पात तरतूद होऊन एक तप लोटले तरीही प्रशासन ठप्प असून महाराष्ट्र-मध्यप्रदेश या दोन राज्यांना जोडणारा निम-मांजरोद नियोजित तापी नदीवरील पुलाकडे शासनाचे दुर्लक्ष असून राजकारणी, सत्ताधिशांमध्ये इच्छाशक्तीचा अभाव आहे, असा आरोप निम-मांजरोद तापी पुल आंदोलन समितीचे नेते व श्रीक्षेत्र कपिलेश्वर संस्थानचे सचिव मगन वामन पाटील तथा मगन भाऊसाहेब आणि परिसरातील ग्रामस्थांनी केला आहे.

मगन भाऊसाहेब पाटील यांच्यासह सेवानिवृत्त अभियंता विजय मंगळे रावसाहेब, सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब दत्तात्रय चौधरी आदींच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने सार्वजनिक बांधकाम विभागाचे





अधिक्षक अभियंता अनिल एल. पवार, शिंदखेडा सा.बां. विभागाचे उपअभियंता संदीपजी पडांगळे यांची नुकतीच भेट घेऊन नियोजित पुलाबाबत निवेदन दिले व परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने आपली भूमिका विषद केली. चर्चेच्या अंती उभय अधिकाऱ्यांचा सकारात्मक दृष्टीकोन दिसून आला. शिष्टमंडळाच्या वतीने निवेदनात म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने साक्री तालुक्यातील देशशिरवाडे येथून राज्यमार्ग-१६ तयार केला आहे. हा मार्ग मुडावद-म्हळसरपासून तापी ओलांडून थाळनेर मार्गे दऱ्याखोऱ्यातून आहे. त्यामुळे हे काम थांबलेले आहे. या अवघड रस्त्याऐवजी राज्यमार्ग-१६ हा मुडावदपासून वळवून पांझरा नदी पुलावरून कपिलेश्वर निममार्गे घेतल्यास तापी पूल होणे सहज शक्य आहे. विशेष म्हणजे यात बांधकात विभागाला जमिन अधिग्रहण, वनविभाग परवानगी असा कुठलाही अतिरिक्त खर्च होणार नाही असे उभय अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिले. तसेच शासनाने यापूर्वीच निम तापी पुलाचा सर्व्हे केला असून संकल्पचित्र, धरणाची भिंत, खूणा, प्रशासकीय मान्यता मंजुर आहेत. पुल झाल्यास मांजरोदपासून पुढे राज्यमार्ग-१६ सुरु होतो. हाच पुल परवडणारा, दोन राज्यांना जोडणारा व दळणवळणाच्या दृष्टीने सुलभ व सोयीचा असून त्यासाठी महाराष्ट्र रस्ते बांधकाम विभागाची परवानगी घ्यावी जेणेकरून पुलाचे काम मार्गी लागेल. अधिक्षक अभियंता अनिल पवार साहेब यांनी शिष्टमंडळाचे सविस्तर आग्रही म्हणणे ऐकूण घेत वरिष्ठांशी आपण चर्चा करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल समितीचे नेते मगन भाऊसाहेब, विजय मंगळे रावसाहेब, नानासाहेब दत्तात्रय चौधरी यांनी त्यांचे आभार मानले.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर, जाहिरात प्रतिनिधी, गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# आपत्ती व्यवस्थापनांतर्गत 'आपदा मित्र / सखी' प्रशिक्षणासाठी इच्छुक युवक-युवतींना नाव नोंदणी करण्याचे आवाहन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

धुळे, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) यांच्या संकल्पनेतुन संपुर्ण देशभरात 'आपदा मित्र' ही योजना राबवण्यात येत आहे. यासाठी धुळे जिल्ह्यातील ३०० आपदा मित्र प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार होती. पैकी मा. जिल्हाधिकारी महोदया श्रीमती भाग्यश्री विसपुते (भा. प्र. से.,) यांचे आदेशान्वये १०० आपदा मित्र/ सखी यांचे प्रशिक्षण पूर्ण झालेले असून उर्वरित आपदा मित्र प्रशिक्षणासाठी इच्छुक युवक युवतींनी नाव नोंदणी करावी असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी मा. श्री. महेश शेलार यांनी केले आहे.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संकल्पनेतुन संपुर्ण देशभरात 'आपदा मित्र' ही योजना राबवण्यात येत आहे. आपत्ती दरम्यान 'प्रथम प्रतिसादकर्ता' हा नेहमी स्थानिक लोकांना आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देऊन सक्षम करणे हे या योजनेचे मुळ उदिष्ट आहे. या योजनेच्या माध्यमातुन जीवित हानी कमी करणे, समाजात आपत्ती व्यवस्थापन विषयक जनजागृती करणे व आपत्तीला प्राथमिक स्तरावर प्रतिसाद देण्याकरिता मनुष्यबळ तयार करणे अशा अनेक बाबी साध्य होणार आहेत.

त्यानुसार धुळे जिल्ह्यात ३०० आपदा मित्र प्रशिक्षणासाठी तयार करण्याचे नियोजित असून प्रथम टप्प्यात शंभर आपदा मित्र सखी प्रशिक्षित करण्यात आल्या आहेत. उर्वरित २०० आपदा मित्र सखी यांची निवड करून प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे.

निवडलेल्या प्रशिक्षणार्थींना शासनाकडुन निवड करण्यात येणा-या यंत्रणेमार्फत आपत्ती व्यवस्थापन विषयांबाबत १२ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणाकरिता वय वर्षे १८ ते ४५ या गटातील शारिरिक व मानसीकदृष्टया सक्षम असलेल्या सामान्य नागरिक, महाविद्यालयीन विदयार्थी, अशासकीय संघटना (एनजीओ), आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, शासकीय व निमशासकीय कर्मचारी इत्यादी यांचा समावेश असेल. तथापी, डॉक्टर, माजी सैनिक, स्थापत्य अभियंता यांच्या करिता वयोमर्यादा ५५ वर्षापर्यंत राहील (मात्र त्यांना अपघात विमा सुविधा अनुज्ञेय राहणार नाही.)

सदर नोंदणी करतांना इच्छुक महिलांचा समावेश करण्याबाबत ही नमुद आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग नोंदविणाऱ्या आपदा मित्रांना विहित करण्यात आलेले १२ दिवसांचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर शासनाकडून ३ वर्षांकरीता आपत्ती समयी शोध व बचाव कार्य करतांना अपघात झाल्यास रु. ५ लक्ष मर्यादेत अपघात विमा तसेच वैयक्तीक आपत्कालीन प्रतिसाद कर्ता संच (किट) पुरविण्यात येईल.

याकरिता जिल्ह्यातील इच्छुक युवक-युवती, महिला, पुरुष, स्वंय सेवक यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्ष येथे जाऊन आपली संपुर्ण माहिती सदर करावी.

या साठी अधिक माहिती करीता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागास ८६९८८६२८९० / ९८३४१३९४४९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. असेही जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी कळविले आहे.

# साक्री ची तनवी साळुंखे झाली उपअभियंता श्रेणी १ अ गटावर पदनियुक्ती

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------



शेवाळी ता. साक्री येथील तन्वी रावसाहेब साळुंके यांची एम. पी. एस. सी. च्या माध्यमातून नुकतीच उपकार्यकारी अभियंता श्रेणी १ गट अ ह्या पदावर नियुक्ती झाली आहे.

तन्वीने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, साक्री येथे केले असून बी. ई. सिव्हिल करून एम. पी. एस .सी. ची परीक्षा दिली. तन्वी भाडणे येथील शारदा माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक श्री. आर. आर साळुंके व सौ. कल्पना रावसाहेब साळुंके यांची कन्या व बाबा आमटे आश्रम शाळेचे शिक्षक सौ. गिरीषा व श्री. जयेश साळुंके यांची बहीण आहे. तन्वीने जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे लक्ष्य पार करून यशोशिखर गाठले आहे.या यशाबद्दल भूविकास बँकेचे माजी अध्यक्ष दिनकरराव पाटील, इंदवेचे माजी सरपंच सुनिल देवरे, साक्री एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पराग बेडसे,सचिव अनिल सोनवणे, आदींनी अभिनंदन केले.

# नांदेड येथे संपन्न झाला विशाल सत्संग : सामाजिक जाणीव आणि अध्यात्म यांचा अनोखा संगम "सत्संग मोक्ष की धारा कोई समझे। राम का प्यारा"

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------------



नांदेड येथे ०६ जुलै रोजी संत रामपाल जी महाराज यांच्या अनुयायांनी एक दिवसीय भव्य सत्संग आणि सामाजिक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात हजारो भाविकांनी सहभाग घेऊन सत्संगाचा लाभ घेतला आणि समाजसुधारणेची प्रतिज्ञा घेतली. सर्व कार्यक्रम मोफत व शास्त्रानुसार पार पडले. जिल्हा सेवेदारांच्या मदतीने सत्संगाची व्यवस्था करण्यात आली.

ती पद्धतशीरपणे चालवली जात होती. सामाजिक सुधारणेच्या दिशेने एक प्रेरणादायी पाऊल असल्याचे त्यांनी या कार्यक्रमाचे वर्णन केले.

यावेळी शेकडो भाविकांनी नाम दीक्षा घेऊन आध्यात्मिक जीवन अंगीकारण्याचा संकल्प केला. ही घटना केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक जाणिवेचे प्रभावी उदाहरण ठरली.

# साक्री पोलीस ठाण्याला अखेर कायमस्वरूपी पोलीस निरीक्षक मिळाले साक्री तालुक्यातील अवैद्य धंद्यावर आता तरी आळा बसेल का?

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------




गेल्या अनेक दिवसापासून प्रभारी अधिकाऱ्याकडून कारभार चालवल्या जात असलेल्या साक्री पोलीस ठाण्याला अखेर कायमस्वरूपी पोलीस निरीक्षक मिळाले आहेत. शहरातील कायदा व सुव्यवस्थेसह अवैध धंदे, वाहतूक कोंडी, वाढलेली गुन्हेगारी पाहता नागरिकांमध्ये कायमस्वरूपी पोलीस निरीक्षकाची मागणी होती; परंतु गेल्या तीन वर्षात साक्रीत तब्बल नऊ अधिकारी बदलूनही समस्या आणि आव्हानाचे चित्र कायम आहे.

तालुक्यात साक्री, पिंपळनेर, निजामपूर या तीन ठिकाणी पोलीस ठाणे कार्यरत आहेत. साक्री शहर हे संवेदनशील शहर असून, नाशिक, नंदुरबार, धुळे जिल्ह्याच्या सीमेवर आहे. नागपूर सुरत महामार्ग व नेत्रण- नाशिक हा राज्य महामार्ग असल्याने "गुन्हेगारांचाही हा महामार्गच ठरला आहे". शेवाळी चौफुली व दहिवेल चौफुली या ठिकाणी वाहनांची तपासणी केल्यास राज्यातून येणाऱ्या गुन्हेगारांना आळा बसू शकतो. याच महामार्गांनी गुरांची, गुटख्याची, बनावट दारूची मोठ्या प्रमाणावर अवैद्य वाहतूक होते. याला रोखण्यासाठी पोलिसांना अधिक सतर्क रहावे लागेल आणि अवैध धंद्यांना आळा घालावा लागेल. साक्री शहर व तालुक्यातील सट्टा, जुगार, देशी, विदेशी दारूची अवैध विक्री, ग्रामीण भागात सुरू असलेली गावठी दारूचे हातभट्टी बंद करण्याची मागणी गावा गावातील नागरिक करीत आहेत. साक्री तालुक्यातील होणारी अवैद्य वाळू वाहतूक ही सुद्धा फार मोठी समस्या बनली आहे. या सर्व समस्यांनी नागरिक त्रस्त झाले आहेत.

नऊ अधिकाऱ्यांच्या बदल्या नंतर नुकतेच रुजू झालेले दहावेपोलीस निरीक्षक दीपक वळवी यांनी तरी अवैध धंदे, अवैध्य वाळू वाहतूक, करकशा आवाजात हॉर्न वाजवणे, शाळकरी मुलींची छेड काढणे या समस्यांना आळा बसवावा अशी नागरिकांची अपेक्षा.

# रत्नागिरी महाराष्ट्रातून उजळला अवयवदानाचा दीप; विणा ब्रह्मदंडे यांच्या अमरत्वाची कथा!

## अवयवदानातून सहा जणांना नवजीवन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------

रत्नागिरी खारेपाटण येथील ५७ वर्षीय विणा ब्रह्मदंडे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पती राजेंद्र ब्रह्मदंडे आणि कुटुंबीयांनी दाखवलेली माणुसकी आणि धैर्य हे साऱ्यांसाठी दीपस्तंभ ठरले आहे. "माझी पत्नी वीरांगना होती. ती जिवंतपणी समाजकार्यात लढा देत होती – आणि आता ती इतरांना जीवन देण्यासाठी अमर होत आहे," अशा शब्दांत राजेंद्र ब्रह्मदंडे यांनी आपल्या पत्नीच्या अवयवदानाचा निर्णय घेताना भावना व्यक्त केल्या.

विणा ब्रह्मदंडे यांना डोकेदुखी आणि चक्कर आल्याने तातडीने रत्नागिरी येथील चिरायू हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी उपचार करत असतानाच, मेंदूतील तीव्र रक्तस्रावामुळे त्यांचा मेंदू कार्य करेनासा झाला. न्युरोलॉजिस्ट डॉक्टर श्रीविजय फडके यांच्या तपासणीनंतर मेंदूमृत्यूचे निदान झाले. यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कुटुंबीयांना माहिती दिली आणि अवयवदानाचा पर्याय समोर ठेवला. त्या क्षणी आभाळाएवढं दुःख कोसळलेलं असूनही पती राजेंद्र ब्रह्मदंडे आणि त्यांच्या मुलांनी धीर दाखवत अवयवदानासाठी तत्काळ संमती दिली.

रत्नागिरीमध्ये अद्यापही अवयव प्रत्यारोपणासाठी नोंदणीकृत रुग्णालय उपलब्ध नसल्यामुळे , द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन' मुंबईचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम पवार यांच्याशी त्वरित संपर्क साधण्यात आला. त्यांनी मुंबई व पुणे ZTCC समन्वयकांशी बोलून मेंदूमृत्यू नोंदणीसाठी अँप्निया चाचण्या आणि अधिकृत प्रक्रिया सुरू केली. पुढे, श्री. पवार यांच्या समन्वयाने आणि डॉ. फडके यांच्या स्वखर्चाने विशेष कार्डियाक ॲम्बुलन्सच्या साहाय्याने विणा ब्रह्मदंडे यांना कोल्हापूरच्या अष्टर आधार हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले.

२७ मे २०२५ रोजी रुग्णास हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. दोन अँप्निया चाचण्या पार केल्यानंतर अधिकृत मेंदूमृत्यू घोषित करण्यात आला. यानंतर २९ मे च्या मध्यरात्री दोन मूत्रपिंड (किडनी), दोन्ही डोळ्यांचे कॉर्निया आणि त्वचा यशस्वीरित्या दान करण्यात आली. दुर्दैवाने योग्य रुग्ण वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे फुफ्फुसे आणि हृदय प्रत्यारोपणासाठी वापरता आले नाहीत.

ही संपूर्ण प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी अष्टर आधार हॉस्पिटलचे डॉ. अमोल कोडोलीकर, डॉ. अभिजीत गवळी, डॉ. अभिजीत पाटील, डॉ. मन्सूर अली, समन्वयक अभिजीत शिंगाडे आणि पुणे ZTCCच्या श्रीमती आरती गोखले यांनी समर्पित सहभाग दिला.

ग्रीन कॉरिडॉरच्या साहाय्याने एक मूत्रपिंड पुण्यातील बाणेर येथील जुपिटर हॉस्पिटलमध्ये पोहोचवण्यात आले. या अवयवदानातून एंड स्टेज ऑर्गन फेल्युअर झालेल्या दोन रुग्णांना जीवनदान मिळाले, चार अंध रुग्णांना दृष्टी लाभली, तसेच भाजलेल्या रुग्णांना त्वचेचा लाभ मिळाला. त्वचा दानासाठी सांगलीतील रोटरी स्किन बँकेच्या कै. कलावती चिंतामण पटवर्धन स्किन बँक टीम यांनी स्वतः कोल्हापूरला जाऊन त्वचा स्वीकारली.

विणा ब्रह्मदंडे देह रूपाने या जगातून गेल्या असल्या तरी त्यांनी दिलेल्या अमूल्य अवयवांमुळे त्या अनेकांसाठी जीवनदायिनी ठरल्या. संपूर्ण समाजाने या महान परंपरेचा आदर्श स्वीकारावा.

या संपूर्ण प्रक्रियेमध्ये 'द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन' चे कोल्हापूर जिल्हा समन्वयक श्री. योगेश अग्रवाल , डॉ. हेमा चौधरी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. रत्नागिरीसारख्या जिल्ह्यातून ब्रेन डेड रुग्णाला शिफ्ट करून प्रक्रिया यशस्वी करणे अवघड होते. या अवघड आणि तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेतून, फेडरेशनचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम पवार यांच्या अनुभवी नेतृत्वाने रत्नागिरीत एक अद्वितीय व ऐतिहासिक उदाहरण घडवले.

# आषाढी एकादशी निमित्त दिंडोरी तालुक्यातील अक्राळेत दिंडी

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------------





दिंडोरी तालुक्यातील अक्राळे येथे श्री गुरु निवृत्तीनाथ भजनी मंडळातर्फे अखिल भाविक वारकरी मंडळ दिंडोरी तालुकाध्यक्ष हभपश्री आबासाहेब महाराज गाडे यांचे मार्गदर्शनाखाली श्री हनुमान मंदिरापासून संपूर्ण गांवात सामुदायिक दिंडी सोहळा संपन्न झाला.दिंडीत समस्त ग्रामस्थ बाल गोपाल महिला पुरुष वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आषाढी वारी या विषयावर हभपश्री आबासाहेब महाराज गाडे यांचे प्रवचन संपन्न झाले.

यावेळी हभपश्री मनोहर जाधव, हभपश्री सुभाष गाडे, हभपश्री अरूण उदार, हभपश्री नंदू गायकवाड, हभपश्री माधव गायकवाड, हभपश्री बाळासाहेब फलाणे, हभपश्री पांडुरंग बागूल, उपसरपंच मा.श्री संदीप केंदळे, हभपश्री फरताळे महाराज, हभपश्री तुकाराम गायकवाड, मृदुंगचार्य हभप महेद्र अहिरे, हभपश्री सुदर्शन गाडे, हभपश्री प्रथमेश रायते, हभप सुमनबाई गाडे, हभप आशाबाई गाडे, हभप सुशीला गाडे, हभप रंभाबाई जाधव, हभप उषाबाई गायकवाड, हभप शांताबाई शिंदे, हभप लीलाबाई गायकवाड, वेशभूषा हभप समीक्षा शिंदे, हभप शिवण्या गाडे, हभप धनश्री जाधव, हभप तनूजा जाधव, हभप इंद्रायणी गाडे, हभप संजीवनी गाडे आदी उपस्थित होते.

सच्चिदानंद सदगुरू वै.ब्र.निवृत्तीनाथ महाराज शिंगवेकर यांचे कृपाशीर्वादाने गेली चाळीस वर्ष अक्राळे गांव भजनी मंडळ व ग्रामस्थ महिला व पुरुष वारकरी परंपरेचा वारसा जपत आहोत, सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण, ध्यान धारणा,अनुष्ठान, त्रंबकेश्वर मासिक एकादशी वारी, रामवारी, दिंडी सोहळा अन्नदान, मागे वारकरी शाखा उद्घाटन व वारकरी मेळावा पदाधिकारी नियुक्ती, श्रावणमासी सोमवार एक दिवसीय उत्सव असे अनेक कार्यक्रमात सहभाग घेऊन अक्राळे गावाने धार्मिक परंपरा जोपासली आहे.

**ह.भ.प. श्री. आबासाहेब महाराज गाडे,**
**तालुकाध्यक्षः अखिल भाविक वारकरी मंडळ दिंडोरी**

# आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा सरकारने रब्बी धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवले

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-----------------------



२०२५-२६ रब्बी हंगामात गोंदिया जिल्ह्यात भाताचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले असून, याची खरेदी महाराष्ट्र विपणन महासंघ आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून खरेदी केंद्रांवर करण्यात येते. खासगी बाजारात धानाला कमी किंमत मिळत असल्याने, २०२५-२६ रब्बी हंगामात धान उत्पादक शेतकरी विपणन महासंघ आणि आदिवासी विकास महामंडळाच्या खरेदी केंद्रांवर मोठ्या प्रमाणात धान विक्रीसाठी आणत आहेत.

मात्र, २०२५-२६ रब्बी हंगामासाठी गोंदिया जिल्ह्यासाठी ठरवलेले धान खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने अनेक धान उत्पादक शेतकरी धान विक्रीपासून वंचित राहिले आहेत. खरेदी केंद्रांवर आणलेले धान केंद्राबाहेर पडून आहे आणि पावसात भिजत आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली असून, त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीची भीती आहे.

शेतकऱ्यांच्या या गंभीर समस्येकडे प्राधान्याने लक्ष देऊन, गोंदिया जिल्ह्याच्या प्रश्नांना आघाडीवर ठेवून सोडवण्यासाठी कटिबद्ध असणारे आमदार विनोद अग्रवाल यांनी ३ जुलै रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन केंद्र सरकारकडून उद्दिष्ट वाढीचा निर्णय येईपर्यंत राज्य सरकारमार्फत शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी केली होती.

आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार विनोद अग्रवाल यांच्या या मागणीचा विचार करून शेतकऱ्यांच्या हितासाठी रब्बी हंगामाच्या भात खरेदीचे उद्दिष्ट वाढवण्यास मान्यता दिली आहे. लवकरच यासंदर्भातील आदेशपत्र जिल्ह्याला प्राप्त होईल.

शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने घेतलेल्या या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल गोंदिया जिल्ह्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांनी सरकार आणि आमदार विनोद अग्रवाल यांचे आभार मानले आहेत.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# 'उमेद' कार्यालयात पावसाचं थैमान – स्लॅबमधून झिरपणाऱ्या पाण्यामुळे २ संगणक, २ फॅन जळून खाक!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------------


"लाडली बहिणी" म्हणणाऱ्या सरकारच्या महिला सक्षमीकरणाच्या गोंडस घोषणा प्रत्यक्षात मात्र पुरात वाहताना दिसत आहेत. गोरेगाव येथील उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तालुका व्यवस्थापन कार्यालय मुसळधार पावसामुळे अक्षरशः धोक्याच्या छायेत आले आहे. स्लॅबमधून झिरपणाऱ्या पाण्यामुळे कार्यालयातील दोन संगणक व दोन फॅन शॉर्ट सर्किटमुळे जळून खाक झाले आहेत, तर महत्त्वाचे शासकीय दस्तावेज नष्ट होण्याच्या उंबरठ्यावर आहेत.

लाडली बहिणी म्हणायचं आणि बैठकीसाठी धड खुर्चीही नाही!

या कार्यालयात महिला कर्मचारी व 'उमेद' योजनेअंतर्गत कार्यरत महिला समूहांचा नियमित वावर असतो. मात्र येथे शौचालयाची, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची, सुरक्षित फाइल स्टोरेजची किंवा योग्य बैठकीची कोणतीही सुविधा नाही. पावसामुळे स्लॅब गळत असून, अनेक फाइल्स थेट पाण्याखाली गेल्या आहेत. इतकंच नव्हे तर, शॉर्टसर्किटमुळे १.५ लाख







रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जातो.

महिला कर्मचारी संतप्त – "लाडली बहिणीचं हेच चीज?"

सरकार मोठमोठ्या घोषणा करते, पण 'उमेद' योजनेच्या कार्यकर्त्यांना तुटपुंज्या सुविधांमध्ये काम करावं लागतं. त्यातही मुसळधार पावसामुळे ही स्थिती आणखी गंभीर बनली आहे. महिला कर्मचाऱ्यांनी रोष व्यक्त करत स्पष्ट विचारले,

"सरकार म्हणतं आम्ही लाडली बहिणी, पण आमचं कार्यालय असं का? आम्हीच जर सुरक्षित नाही तर सक्षमीकरण कसं होणार?"

स्लॅबमधून थेट फायलींवर पाणी – दस्तावेजांचा जीव धोक्यात!

कार्यालयात गेल्या काही वर्षांपासून साठवलेले महत्त्वाचे दस्तावेज, योजना अहवाल, महिलांची वैयक्तिक माहिती यावर थेट स्लॅबमधून पाणी झिरपत आहे. यावर अद्याप कोणतीही प्लास्टिक शीट, सुरक्षा कपाट किंवा शेल्फची व्यवस्था नाही. दस्तावेज भिजले तर त्या महिलांच्या भविष्यातील लाभांवरही गदा येणार आहे.

जनप्रतिनिधी गप्प, छत बोलतंय – 'उमेद'चं अस्तित्वच धोक्यात!

अजूनतरी कोणताही पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य वा स्थानिक राजकारणी या कार्यालयाला भेट देऊन पाहणी केली नसल्याची माहिती मिळत आहे. इतक्या तक्रारी असूनही कारवाईचं नाव नाही.

"स्लॅब झिरपतंय, उमेद गळतंय – पावसात महिला योजनेचं पतन!" , " लाडली बहिणींच्या सन्मानावरच गळती – सरकार झोपलेलं, छत जागं!" ,"उमेद कार्यालयात जलप्रलय – संगणक, दस्तावेजांची वाताहत!", " स्लॅबमधून थेट महिलांच्या आशांवर पाणी – प्रशासन गप्प!" , " 'उमेद' च्या छताखालचा शॉक – १.५ लाखांचं नुकसान, प्रतिनिधी गप्प!"

# निघोज येथील धर्मरक्षक प्रतिष्ठाण आयोजित रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न

## मा.संदिप पाटील वराळ यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



पारनेर तालुक्यातील निघोज येथे धर्मरक्षक प्रतिष्ठाण यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. मा.सरपंच संदिप पाटील वराळ यांच्यावर विशेष प्रेम असणार्या तसेच पै.सुभाष वराळ पाटील यांच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात २२४ युवकांनी रक्तदान केले. तसेच रक्त पिशवी कमी पडल्याने ३५-४० युवकांना रक्तदान करता आले नाही. शिबीरात पै.विलास वराळ पा.,पै.लहू निचीत, हर्षद इधाटे, स्वप्निल आतकर, आप्पाशेठ वराळ तसेच सर्वच सहकार्यांनी घेतलेल्या कष्टाच्या जोरावर अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील युवकांनी रक्तदान केले. कॅप्टन विठ्ठल वराळ यांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पूजन करुन रक्तदान शिबीराची सुरुवात करण्यात आली.रक्तदानाच्या निमित्ताने भाजपा कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ दादा कोरडे, शिवसेना अहिल्यानगर दक्षिण जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, शिवसेना होमिओपॅथिक प्रदेश प्रमुख डाॅ.करण गाडे,शिवसेना नेते बाळासाहेब माळी, शिवसेना केमिस्ट विंगचे पारनेर तालुका अध्यक्ष अक्षय भंडारी, बजरंग दलाचे पदाधिकारी मेजर दत्ता मोटे, राळेगण थेरपाळ गावचे सरपंच पंकज कारखिले,विठ्ठल शेठ कवाद, रोहिदास लामखडे, बबन तनपुरे, अशोक ढवळे, अनिल शेटे, अर्जुन लामखडे, दत्ताभाऊ गुंड, संदिप वराळ, संदिप कवाद, निलेश कवाद,शांताराम कवाद,माऊली वरखडे,टाकळी ढोकेश्वर गावचे उपसरपंच रामा तराळ आणि मित्र परिवार, भास्कर सुपेकर मित्र परिवार,सुभाष गाडीलकर मित्र परिवार, अमोल आल्हाट,अमोल सोनावळे,बेल्हे गावचे युवा नेते मयुर गुंजाळ मित्र परिवार, ॲड.तुषार औटी मित्र परिवार,कैलास कोठावळे मित्र परिवार,पै.जयदिप सालके मित्र परिवार, गणेश बोदगे मित्र परिवार, अमोल भाऊ उगले, राहुल भाऊ औटी मित्र परिवार, पै.संदिप कावरे मित्र परिवार, प्रदिप किठे मित्र परिवार, विकास वरखडे मित्र परिवार, पै.विकी गुंजाळ मित्र परिवार,पै.राहुल गायकवाड मित्र परिवार,मेजर विकास वराळ मित्र परिवार, मेजर दगडू डेरे मित्र परिवार,प्रभू श्रीराम नवमी उत्सव समिती, मा.पप्पूभाऊ राजापुरे मित्र परिवार,ऋतिक पठारे मित्र परिवार, फुटबॉल संघ निघोज, संतोष बोदगे मित्र परिवार, किरण थोरात मित्र परिवार, अमोल गजरे मित्र परिवार, अखिल भारतीय बैलगाडा संघटना पारनेर तालुका मित्र परिवार, बजरंग दल मित्र परिवार, पत्रकार संतोष इधाटे, सुरेश खोसे, भास्कर कवाद, दिपक वरखडे, संदिप इधाटे,सचिन जाधव,जय हरेल तसेच निघोज व पंचक्रोशीतील सर्वच मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान शिबीर घेण्यासाठी ओम ब्लड सेंटर शिरुर यांचे सौजन्य लाभले तसेच जनसंपर्क अधिकारी मा.सोमनाथ सोनवणे सर तसेच राजेंद्र सूर्यनारायण सर यांचे मार्गदर्शन लाभले

# इमाम हुसैन (अ.स.) यांच्या बलिदानाला अभिवादन शिरुरमध्ये शांततेत, श्रद्धेने पार पडली मोहर्रमची मिरवणूक

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

मोहर्रम म्हणजे केवळ दुःखाचा दिवस नाही, तर हजरत इमाम हुसैन (अ.स.) यांच्या न्याय, सत्य आणि अन्यायाविरुद्ध लढ्याच्या अमर बलिदानाची आठवण करून देणारा काळ. शिरूर शहरात दिनांक ६ जुलै २०२५ रोजी ही परंपरा श्रद्धा, शिस्त आणि सलोखा यांचा आदर्श ठेवत साजरी झाली. शहरात विविध भागांतून निघालेली मोहर्रमची सवारी व ताजियांची मिरवणूक अत्यंत शांततेत आणि भक्तिभावाने पार पडली.

शहरातील विविध मोहल्ले, आळी व वस्त्यांतील अस्थान्यांतून निघालेल्या सवारी व ताजियांनी रोषणाईने सजवलेल्या रस्त्यांवरून मार्गक्रमण केले. बारामती येथील अमर बॅण्ड यांच्या सादरीकरणाने वातावरण भक्तिभावाने भारून गेले, तर "या हुसैन!" च्या घोषणांनी श्रद्धेचा आविष्कार झाला.

मिरवणुकीतील अस्थाने व मानकरी:

जिंदारशा बाबा, असुरखाना फकीर मोहल्ला – हाजी अब्दुल सत्तार उर्फ भैया तांबोळी

हजरत मौला अली कोठला, फकीर मोहल्ला – अब्दुल भाई सय्यद, ख्वाजा गरीब नवाज अस्थाना, लाटे आळी – बंडू जाधव हजरत ईमामे कासिम, असुरखाना लाटे आळी – शौकत शेख, शहेनशहा हजरत बारा इमाम, कोठला इस्लामपुरा – लियाकत अहमद शहा हस्सुद्दीन मदारी, मदारी वस्ती, बारा इमाम कोठला , मौला अली मुश्किल कुशा



अस्थाना, कुंभार आळी – सोहेल शेख

हजरत बारा इमाम कोठला, फकीर मोहल्ला – नजीर शहा

हजरत ईमामे कासिम, कोठला मुंबई बाजार – एजाज भाई व फय्याज भाई सौदागर

हजरत बारा इमाम, कोठला मारुती आळी – मोहम्मद रफीक शेख

लाटे आळी, मारुती आळी, सरदार पेठ, हलवाई चौक, सुभाष चौक, सोनार आळी, इस्लामपुरा, कुंभार आळी, पाचकंदील चौक, राम आळी या प्रमुख रस्त्यांमधून मिरवणूक मार्गक्रमण करत करबला मैदान (लाटे आळी) व मदीना मस्जिद येथे ताजिया व सवारींचे शांततेत व सन्मानपूर्वक विसर्जन करण्यात आले.

बारामती येथील अमर बॅण्ड हे विशेष आकर्षण तसेच पाचकंदील चौकात गेल्या अनेक वर्षा पासुन स्व.अकबर बागवान व स्व. शौकतभाई खान( डायव्हर) स्व. हाजीवाहेद भाई शेख व बाबर भाई खान यांनी सुरू केलेल्या शरबत वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला

करबला मैदान येथे शरबत वाटप

तालामुल्ला शहा ताजिया भाजी बाजार व बारा इमाम कोठला मदारी वस्ती ताजिया रात्री १२ वाजता भक्तीमय वातावरणात विसर्जित

शिस्त व सौहार्दतेचे दर्शन:

या धार्मिक कार्यक्रमात कुठलाही अनुचित प्रकार न होता मिरवणूक पूर्णतः शिस्तबद्ध, शांततामय आणि सलोख्याच्या वातावरणात पार पडली. पोलीस प्रशासन व स्थानिक समित्यांनी केलेल्या चोख नियोजनामुळे संपूर्ण मिरवणूक सुरळीत झाली.

मोहर्रमचे महत्त्व:

इस्लामी पंचांगातील पहिला महिना म्हणजे मोहर्रम. यातील १० वा दिवस 'यौमे आशुरा' म्हणून ओळखला जातो. याच दिवशी करबलाच्या रणभूमीत हजरत इमाम हुसैन (अ.स.) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष करत प्राणांचे बलिदान दिले. त्याग, धर्मनिष्ठा, संयम आणि मानवतेच्या मूल्यांचा हा वारसा फक्त मुस्लिम समाजापुरता मर्यादित नसून सर्व मानवतेला सत्याचा मार्ग दाखवणारा दीपस्तंभ आहे.

शिरूर शहराने ठेवला धार्मिक सौहार्दतेचा आदर्श

या वर्षीही शिरूरकरांनी मोहर्रमची मिरवणूक शांततेत, एकात्मतेत व श्रद्धेने पार पाडून सामाजिक सौहार्दतेचा आदर्श निर्माण केला आहे. ही परंपरा पुढील पिढ्यांसाठीही संवेदनशीलता, सहिष्णुता आणि मूल्यांची शिकवण देणारी ठरेल, यावर सर्वांचे एकमत आहे.

# गोरगरीब आदिवासी मुलांसाठी सरसावले राज्यभरातून मदतीचे हात

## जतपुरा ( नांदगाव ) येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

मराठी शाळा वाचवण्यासाठी, एकलव्य आदिवासी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था लिंबी व राज्यभरातील शिक्षणप्रेमी मित्र परिवाराच्या वतीने एक हात मदतीचा राबविण्यात आला. या द्वारे फक्त २१ रुपये गरीब मुलांच्या शालेय साहित्यासाठी दान करा अशी विनंती करण्यात आली.संस्थेने सुमारे ५०० आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचं ध्येय ठेवले होते.याद्वारे विद्यार्थ्यांना वही, पेन, पेन्सिल, अंक लिपी, खोडरबर, शॉपनर इत्यादी साहित्य वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जतपूरा तालुका नांदगाव जिल्हा नाशिक येथे योगेश थोरात साहेब (शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती नांदगाव) व संतोष भैरव सर केंद्रप्रमुख यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या आवारात फुलांचे रोपटे लावून करण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून ही शाळा निवडण्याच कारण म्हणजे प्रजन्य छायेच्या प्रदेशात खडकाळ भागात वसलेली ही छोटीशी वस्ती, उत्पन्नाची अपुरे साधने, गोर गरीब कुटुंबातील विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. या निमित्ताने आदिवासी गरीब मुलांच्या शिक्षणात खारीचा वाटा उचलण्याचा भाग्य लाभलं याचा नक्कीच आनंद आहे.आम्ही उपक्रमाच्या माध्यमातून समाजाकडून मदतीची रक्कम फक्त २१ रुपये एवढी ठेवली होती.आपले २१ रुपये सुद्धा कोणाच्यातरी





आयुष्यात आनंद निर्माण करू हा यामागील हेतू होता. आज घडीला समाज परिवर्तनासाठी झटणारी खूप माणसं आहेत.त्यांच्यापर्यंत पोहोचलं तर नक्कीच परिवर्तन होण्यास वेळ लागणार नाही.आम्ही संस्थेच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरात काम करणाऱ्या लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. आमच्या आव्हानाला साद देत जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेत भविष्याचे स्वप्न रंगवणाऱ्या लेकरांना साथ देणारे मदतीचे हात राज्यभरातून पुढे आले. सर्वांनी सामाजिक बांधिलकी जपत दुर्गम भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या गरीब मुलांना मदत करण्यासाठी दातृत्वाचे हात पुढे केले. गोरगरिबांच्या शिक्षणाचा शेवटचा आधार बनलेली मराठी शाळा वाचवण्यासाठी सुरू करण्यात आलेला हा उपक्रम अल्पावधीतच प्रसिद्धीस आला. आमच्या आव्हानाला व्यापारी, शेतकरी, शेतमजूर, तरुण तसेच प्रशासनात विविध पदावर सेवा बजावणाऱ्या मित्रांनी दिलेला प्रतिसाद.यामुळेच आज आपण ५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच्या स्वरूपात मदत मिळत आहे. ग्रामीण भागातील वाड्यावरस्त्यावर राहणारे लोकांच्या आयुष्यात दररोजच्या जगण्यामरण्याचा संघर्ष सुरू आहे.तरीही माणसं विना तक्रार आनंदाने जगण्याचा प्रयत्न करतात.त्यांच्या पाल्याच्या शैक्षणिक अडचणी सुद्धा कमी नाहीत.त्यांना छोटीशी मदत करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करू शकलो म्हणजे आपण धन्य झालो.लहान मुलांच्या शिक्षणाला गती देण्यासाठी आपल्याला हातभार लावता आला व या विद्यार्थ्यांन मध्ये साक्षात पांडुरंग शोधला. या वेळी थोरात साहेबांनी आपले मनोगत व्यक्त करताना या उपक्रमाचे कौतुक केले.जशी आपल्या शाळेला मदतीसाठी राज्यभरातून मदतीचे हात पुढे आले.त्याच पद्धतीने आपण उच्च शिक्षण घेऊन आयुष्यात यशस्वी झाल्यानंतर भविष्यात गोर गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या हाती पेन देण्याचं कार्य करावे असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.साहेब पुढे म्हणाले ज्यांना विठ्ठलाच्या भेटीला जाता येत नाही.त्यांच्या भेटीला साक्षात विठ्ठल येत असतो.आपल्या प्रत्येक चांगल्या कामात पांडुरंग दडलेला आहे फक्त तो आपल्याला शोधता आला पाहिजे. यावेळी उपस्थित संतोष भैरव सर,शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती विद्या पाटील मॅडम,सह शिक्षक अमोल आढळकर सर, बोरसे सर,प्रीती दरोडे मॅडम.शालेय समिती अध्यक्ष सुनील डोळे समितीचे सर्व सदस्य व प्रतिष्ठित गावकरी उपस्थित होते.

# शिरूर पोलीस स्टेशनत ग्रामसुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण बैठक संपन्न – चोरीच्या घटनांवर आळा बसवण्यासाठी ग्राम सुरक्षा यंत्रणा प्रभावी करण्याचे आवाहन

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------------------

गावपातळीवर वाढत चाललेल्या चोरीच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी शिरूर पोलीस स्टेशनच्या वतीने एक महत्त्वपूर्ण बैठक आज दिनांक ७ जुलै २०२५ रोजी पार पडली. या बैठकीस मा. श्री प्रशांत ढोले (उपविभागीय पोलीस अधिकारी, शिरूर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी १२.३० ते १.४० या वेळेत पोलीस स्टेशनमध्ये ही बैठक संपन्न झाली. या वेळी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील विविध गावांतील पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने ग्राम सुरक्षा यंत्रणा अधिक प्रभावी कशी करता येईल, यावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

प्रमुख मार्गदर्शन व सूचना पुढीलप्रमाणे:

१. ग्राम सुरक्षा यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वित करावी

प्रत्येक गावामध्ये पोलीस पाटील, सरपंच व ग्रामस्थ यांच्या समन्वयाने ग्राम सुरक्षा यंत्रणा उभी करावी. या यंत्रणेमार्फत गावामध्ये संशयित हालचालींवर लक्ष ठेवता येईल तसेच पोलिसांपर्यंत तत्काळ माहिती पोहोचवता येईल. यामुळे चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळवणे शक्य होईल, असे ढोले साहेबांनी सांगितले.

२. ग्राम सुरक्षा दल सक्रीय करावे

गावांमध्ये अस्तित्वात असलेल्या ग्राम सुरक्षा दलांना अधिक ॲक्टिव्ह करणे आवश्यक आहे. त्यांच्याकडून दररोज रात्री टप्प्याटप्प्याने गावात गस्त घालण्याचे नियोजन करण्यात यावे. या गस्तीद्वारे गावामध्ये सुरक्षा वाढून चोऱ्यांसारख्या घटना टाळता येतील.

३. सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे नियोजन करावे



गावातील मुख्य रस्ते, प्रवेशद्वारे, बाजारपेठा, शाळा व इतर संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अत्यावश्यक आहे. यामुळे केवळ चोरीच नव्हे, तर अन्य गुन्ह्यांच्या अनुषंगानेही तपासात मोठी मदत होते. सीसीटीव्हीमुळे दहशत कमी होते आणि सुरक्षा यंत्रणा सक्षम होते.

४. अंमलबजावणीला गती द्यावी

ग्राम सुरक्षा यंत्रणा व दल यांचे नियोजन केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात प्रभावीपणे राबवले जावे. गावपातळीवर यासाठी निधी, मनुष्यबळ व समन्वयाची आवश्यकता असून त्यासाठी स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

पोलीस निरीक्षक श्री. संदेश केंजळे यांची पुढाकारात महत्त्वपूर्ण भूमिका

या बैठकीचे आयोजन पोलीस निरीक्षक श्री. संदेश केंजळे यांच्या पुढाकाराने करण्यात आले. त्यांनी उपस्थितांना गावांची सुरक्षा व्यवस्था सुधारण्यासाठी पोलीस प्रशासन नेहमीच पाठीशी राहील, असा विश्वास दिला.

ग्रामसुरक्षा ही केवळ पोलीस यंत्रणेची जबाबदारी नसून ग्रामस्थांचीही जबाबदारी आहे, हे अधोरेखित करत त्यांनी ग्रामस्थांना सहभागासाठी आवाहन केले.

ग्रामस्थांनीही दिली सकारात्मक प्रतिक्रिया

या बैठकीदरम्यान अनेक सरपंच व ग्रामस्थांनी आपल्या गावात सुरू असलेल्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची माहिती दिली. काही गावांमध्ये सीसीटीव्ही बसवले गेले असून सुरक्षा दल कार्यरत असल्याचे सांगण्यात आले. इतर गावांनीही यावर तत्काळ काम सुरू करण्याचे आश्वासन दिले.

ग्रामसुरक्षा हेच खरे गावाचे बळ – पोलिस आणि जनतेच्या संयुक्त सहकार्यातूनच सुरक्षित गावाची उभारणी शक्य आहे.